# मविप्र सभेत विद्यापीठ विषयावरून प्रचंड गोंधळ

## सरचिटणीसांचा मंजुरीचा तर अध्यक्षांचा नामंजुरीचा दावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नाशिक –** मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेच्या प्रचंड गोंधळात पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विद्यापीठ स्थापनेच्या विषयावरून अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले आणि सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांच्याकडून परस्परविरोधी दावे होत आहेत. अध्यक्षांनी मविप्र विद्यापीठ स्थापनेचा विषय नामंजूर केल्याचे जाहीर केले तर, सरचिटणीस अ‍ॅड. ठाकरे यांनी मविप्र विद्यापीठ स्थापनेच्या प्रस्तावास आवाजी बहुमताने सभासदांनी मंजुरी दिल्याचे म्हटले आहे.

मविप्र संस्थेची १११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी तुकारामजी रौंदळ सभागृहात संस्थेचे अध्यक्ष डॉ. ढिकले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी सरचिटणीस अ‍ॅड. ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे यांसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. विद्यापीठ स्थापण्याच्या विषयावरून सत्ताधारी अ‍ॅड. ठाकरे आणि विरोधी नीलिमा पवार यांच्या गटात दुफळी निर्माण झाल्यामुळे ही सभा वादळी ठरणार असल्याचे स्पष्ट होते. सभेपूर्वी दोन्ही गटांनी राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांची भेट घेऊन आपली बाजू मांडली होती. सभेत लेखापरीक्षण आणि स्वायत्त विद्यापीठाच्या मुद्द्यावरून गदारोळ उडाला. लेखापरीक्षक बदलण्याला मंजुरी

दिल्यानंतर 'मविप्र विद्यापीठ' स्थापनेचा प्रस्ताव मांडला गेला. त्याचवेळी सभासदांकडून गोंधळ सुरू झाला. वाद वाढत असल्याने अध्यक्ष डॉ. ढिकले यांनी हा विषय फेटाळल्याचे सांगून सभा संपल्याचे जाहीर केले. अध्यक्षांनी या विषयावर कुठलीही चर्चा होऊ दिली नाही. त्यांच्या समर्थकांनी गोंधळ घालून सभा उधळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप सरचिटणीस अ‍ॅड. ठाकरे यांनी केला. त्यानंतर लगेचच प्रतिसभा झाली. सभासदांनी मविप्र विद्यापीठ प्रस्तावास मंजुरी देत, सभासदांच्या भल्यासाठी हे विद्यापीठ झालेच पाहिजे, असे आवाजी मताने मंजूर करण्यात आल्याचे अ‍ॅड. ठाकरे यांनी म्हटले आहे.

**संभ्रम दूर करण्यासाठी समिती**

मविप्र विद्यापीठ प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्याआधी कार्यकारिणीतर्फे मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांची एक सदस्यीय समिती स्थापन केली जाईल. त्याद्वारे विद्यापीठाच्या आर्थिक बाबी, पात्रता आणि विद्यापीठाचे मविप्र संस्थेकडे असलेले स्वामित्व याबाबतीत सभासदांच्या मनातील संभ्रम दूर करण्यात येणार आहे.

**खाद्य पदार्थांची फेकाफेक**

मविप्रच्या सभेत चांगलाच गदारोळ झाला. सभासदांना खाद्य पदार्थांची पाकिटे दिली गेली. गर्दीत लाडू, कचोरी, पाण्याच्या बाटल्या व्यासपीठाच्या दिशेने भिरकावल्याचे पहायला मिळाले. निफाड तालुक्यातील एक सभासद कमरेला पिस्तुल लावून आला होता. गुंड प्रवृत्तीचे लोक आणून विरोधी गटाने बिहारसारखी स्थिती निर्माण केल्याचा आरोप सरचिटणीस अ‍ॅड. नितीन ठाकरे यांनी केला. या संदर्भात संस्थेमार्फत पोलीस ठाण्यात तक्रार दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# नाशिक जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक –** जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात पाच दिवसात बिबट्याच्या हल्ल्यात दोन जणांचा मृत्यू झाला आहे. शनिवारी सायंकाळी निमगाव-देवपूर शिवारात शेतात काम करत असलेल्या शेतमजुरांच्या दीड वर्षीय बालकास ओढून नेले.

सिन्नर तालुक्यातील खडांगळी येथील शेतकरी अर्जुन कोकाटे यांच्या निमगाव -देवपूर शिवारातील चाळींमध्ये काही शेतमजूर कामासाठी आले आहेत. शनिवारी हे मजूर मका तोडणीसाठी शेतावर गेले होते. त्यावेळी बिबट्याने चाळीमध्ये प्रवेश करुन झोळीत झोपलेल्या बालकाला उचलून नेले. या हल्ल्यात दीड वर्षाच्या गोलु शिवराज शिंगाडे याचा जीव गेला. त्याचे पालक पेठ तालुक्यातील कुंबाळे येथील रहिवासी आहेत. मजुरीसाठी या ठिकाणी आले होते. या घटनेनंतर बिबट्याचे हल्ले रोखा, त्याला जेरबंद करा, या मागणीसाठी ग्रामस्थांनी रविवारी रास्ता रोको आंदोलन केले. वनविभागाने बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे लावले आहेत.

याआधी मागील आठवड्यात सिन्नर तालुक्यातील पांचाळे परिसरात सारंग थोरात या १० वर्षाच्या मुलाचा बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला.

ड्रोनच्या माध्यमातून बिबट्यांचा शोध घेण्यात येत असून शनिवारच्या घटनेनंतर इगतपुरी येथून जादा कुमक तसेच संगमनेरहून श्वानपथक बोलविण्यात आले असल्याची माहिती सिन्नरचे वनपरिक्षेत्र अधिकारी हर्षल पारेकर यांनी दिली.

# मनमाडमध्ये आज प्रेरणाभूमी जतनासाठी आंदोलन

**लोकसत्ता वार्ताहर**

**मनमाड –** शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण झालेल्या ऐतिहासिक प्रेरणाभूमीच्या जतनासाठी आता निर्णायक लढ्याला सुरुवात होत आहे. १५ सप्टेंबर रोजी प्रेरणाभूमी विकास कृती समितीच्या वतीने आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंदोलनात बाबासाहेबांचे पणतू प्रा. डॉ. अक्षय आंबेडकर सहभागी होणार आहेत. मनमाड येथे कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या पुढाकाराने आणि लोकवर्गणीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी आश्रम उभारण्यात आला आहे. या आश्रमाची वास्तू सध्या जीर्णावस्थेत आहे. नऊ डिसेंबर १९४५ रोजी बाबासाहेबांच्या हस्ते या वास्तूचे भूमिपूजन झाले होते. आणि १७ नोव्हेंबर १९५१ रोजी लोकार्पण देखील बाबासाहेबांच्या हस्ते झाले होते. या वास्तूच्या भूमीला 'प्रेरणाभूमी' आणि १७ नोव्हेंबर या दिवसाला 'प्रेरणादिन' म्हणून जाहीर करावे, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळून आंदोलन होणार असून जिल्ह्यांतून कार्यकर्ते आणि अनुयायी मनमाडकडे रवाना होणार आहेत. प्रसिद्ध गायक संदेश उमप यांच्यासह अनेक जण या आंदोलनात सहभागी होणार आहेत. वास्तूच्या ७५ वर्षांचा अमृत महोत्सव पुढील वर्षी आहे. वास्तू धोकादायक अवस्थेत आहे. अनेक भागांची पडझड झाली असून, ही ऐतिहासिक वास्तू नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या पार्श्वभूमिवर प्रेरणाभूमी कृती समितीने पुढाकार घेऊन या वास्तूच्या जतन आणि संवर्धनासाठी आवाज उठवला आहे. ही लढाई आत्मसन्मान, अस्मिता आणि ऐतिहासिक वारशाच्या जतनाची असून, शासनाच्या तसेच संबंधित यंत्रणांच्या लक्षात आणून देण्यासाठी हे लक्षवेधी आंदोलन महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नागरिकांनी या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भारत- पाकिस्तान क्रिकेट सामन्याविरोधात मनसेचे आंदोलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक –** आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत दुबई येथे परंपरागत प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यास विरोध म्हणून नाशिक रोड येथील उपनगर परिसरात मनसेशी संबंधित वाहतूक सेनेने एक वेगळेच आंदोलन करुन आपला संताप व्यक्त केला.

वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष निलेश सहाने यांच्या नेतृत्वाखाली उपनगर येथे चक्क टीव्ही फोडो आंदोलन करण्यात आले. टीव्ही फोडून सरकारचा निषेध करण्यात आला. कार्यकर्त्यांकडून पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी शहर चिटणीस अभिषेक गुरव, विभाग उपाध्यक्ष राहुल पाटील, प्रकाश बोधवानी, अनिल देठे, विल्यम कॉक्स, अमोल गुरव, अनिल गांगुर्डे, नाना सहाणे, प्रथम पाटील, कृष्णा बरके, ललित पागेरे, जतीन कोकणे आदी उपस्थित होते

# नाशिकरोडजवळ रेल्वेखाली युगलाची आत्महत्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक–** नाशिक रोड परिसरात युगलाने मुंबईझावडा एक्स्प्रेससमोर उडी घेत आत्महत्या केली. ही घटना शनिवारी पहाटे जेलरोडजवळील पवारवाडीपुढे एकलहरेकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ घडली. नाशिक रोड पोलिसांनी अकस्मात मृत्यू अशी नोंद केली आहे.

मृत मुलगा अंदाजे २५ ते ३० वयोगटातील असून सडपातळ शरीरयष्टीचा आहे. त्याच्या अंगावर काळ्या रंगाची कार्गो पॅन्ट आणि काळ्या रंगाचा हाफ शर्ट आहे. तसेच पांढऱ्या रंगाचे जॅकेट आहे. मृत मुलगी २० ते २२ वयोगटातील असून मध्यम बांध्याची आहे. तिच्या अंगावर निळ्या रंगाची लेगिन्स, निळ्या व पांढऱ्या चौकटींचा टॉप आणि जॅकेट आहे. मृत व्यक्तीच्या खिशात सिटीलिंक बसचे तिकीट होते. दोघे शुक्रवारी त्र्यंबकेश्वर तालुक्यातील बेजे फाटा येथून बसने प्रवासास निघाले होते. त्यानंतर रविवार कारंजा येथे उतरले. नांदूर नाकामार्गे नाशिक रोडकडे जाणाऱ्या बसने प्रवास केला, अशी माहिती त्या तिकीटावरुन मिळाली. प्रवासादरम्यान त्यांनी बस चालक व वाहक यांच्याकडे पवारवाडी झजेलरोडकडे जाणाऱ्या रस्त्याची चौकशी केली. शुक्रवारी नऊ वाजता सैलानी बाबा चौकात उतरून त्यांनी राजराजराजेश्वरी मार्गे एकलहरेकडे जाणाऱ्या रेल्वेरुळावर थांबून पहाटे दोन वाजता आत्महत्या केली.

पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार हे दोघे त्र्यंबकेश्वर तालुक्यातील आसपासच्या गावांशी संबंधित असावेत. घटनेचा अधिक तपास नाशिक रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे आणि पोलीस निरीक्षक बडे नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संदीप कुऱ्हाडे करत आहेत.


लोकसत्ता Classifieds

**व्यवसायविषयक**

नवकेतन
wholesale
ACRYLIC SHEET
POLYCARBONATE SHEET
Gangadham-Katraj Rd Hill Top, Pune 37
whatsapp only
9426071410

0090382591-16-1

**विकणे आहे**

SALE
Upto 70% Off
[Only 5 Days]
All kind of Smart Gadgets
*Mobile, *Laptop, *Kitchen
*Home Decor, *Solar, *Gifts
Home delivery
visit: smartg.co.in

0050274443-1-1

**यात्रासहल**

*श्रीरामकृष्ण* :- शास्त्रोक्त नर्मदा परिक्रमा- १५-११-२०२५// *गिरनार परिक्रमा* -०१-११-२०२५// त्रिस्थळी- नैमिष्यारण्य- चित्रकुटसह- २४-१०-२०२५// कर्नाटक दर्शन- ०१-११-२०२५// ३-१-२०२६// कुरवपुर पिठापुर -०६-१०-२०२५// *भुतान* -२८-१०-२०२५// नेपाळ- मुक्तिनाथसह- २५-१०-२०२५// *अंदमान*- १५-११-२०२५// हंपी- बदामी- ३१-१०-२०२५// *बेंगलोर- मैसूर- कुर्गसह*-३१-१०-२०२५// भागवत सप्ताह- राजस्थान दर्शन- २४-१२-२०२५// १४-११-२०२५// बापट- 9137001395/ 9820023106.

0070945299-20

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अ‍ॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.



pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

**परिशिष्ट-IV-ए - स्थावर मालमत्तेची ई-लिलाव विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ८(६)च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव-विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२ कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११० ००१. फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

**शाखा कार्यालय नाशिक : ४०७ व ४०८, ४था मजला, पद्म विश्व लॅण्डमार्क, तनिष्क शोरूमजवळ, अ‍ॅक्सिस बँकेच्या वरती, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२.**

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. 'डी'मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक/ प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. 'सी'मध्ये वर्णिल्यानुसार) **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे. सदर स्थावर मालमत्तेची विक्री याखाली दिलेल्या तपशिलानुसार **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येणार आहे. ऋणको/ गहाणकार/ विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. 'ए'मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको/ गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया **मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड/ सुरक्षित धनको**च्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

| लोन नं./ ऋणको/ सह-ऋणको/ हमीदार/ विधि वारसदाराचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम व तारीख (बी) | ताब्याचा प्रकार (सी) | गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी) | राखीव किंमत (आरपी) (ई) | इरठे (आरपीची १०%) (एफ) | बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी) | बोलीवृद्धी दर (एच) | पाहणीची तारीख व वेळ (आय) | लिलावाची तारीख व वेळ (जे) | ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरणे, जर असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एचओयू/एनएसके/१२२१/९३३२९५ प्रमोद के. झाडे, जयश्री प्रमोद झाडे शा.का. : नाशिक | रु. १६६१४६३.०५/- व ०६.०६.२०२३ रोजीप्रमाणे | प्रत्यक्ष ताबा | फ्लॅट नं. ३, पहिला मजला, प्लॉट नं. २१, सर्व्हे नं. १२३/ए/१, गणराज हाइट्स अपार्टमेन्ट, ध्रुव नगर, गंगापूर सातपूर लिंक रोड, निगल पार्कच्या मागे, विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोर, बबन लॉन्ससमोर, शिवाजी नगर, गंगापूर शिवार, नाशिक-४२२ ००७, महाराष्ट्र, भारत. | रु. १,२८७,००० | रु. १२८,७०० | २९.०९.२०२५ | रु. १०,००० | २६.०९.२०२५ रोजी दु. १२.०० व दु. ०४.०० दरम्यान | ३०.०९.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान | ज्ञात नाही |
| एचओयू/एनएसके/१२२१/९३३८७० विनोद यशवंत राऊत, मोनिका विनोद राऊत, शा.का. : नाशिक | रु. १५७२८३०.९५/- व ०७.११.२०२३ रोजीप्रमाणे | प्रत्यक्ष ताबा | फ्लॅट/युनिट नं. ७, तळमजला + पहिला मजला, प्लॉट नं. २२ ते २६, सर्व्हे नं. ५०५/२, लक्ष्मी पार्क, साखर कारखाना रोड, अ‍ॅट पोस्ट पळसे सिन्नर, बंगाली बाबा स्टॉपच्या पुढे, कालव्याजवळ, नाशिक-४२२ १०३, महाराष्ट्र, भारत. | रु. १,३६९,००० | रु. १३६,९०० | २९.०९.२०२५ | रु. १०,००० | २२.०९.२०२५ रोजी दु. १२.०० व दु. ०४.०० दरम्यान | ३०.०९.२०२५ रोजी दु. ०२.०० व दु. ०३.०० दरम्यान | ज्ञात नाही |

***त्याकरिता वसुली आणि/ किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्यानुसार १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार इ.सह एकत्रित. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीनुसार रकाना क्र. 'के'मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर/ सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार/ दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरेदीदार/ बोलीदाराद्वारा, त्याच्या/ तिच्याकडील, सोसावयाचे आहेत/ प्रदान करावयाचे आहेत. भावी खरेदीदार/ बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्ररीत्या पडताळणी करून निश्चित करावेत. (१.)** आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची विक्री करणे, अभिहस्तांतरण आणि/ किंवा वासलात लावणे यापासून 'पीएनबीएचएफएल'ला/ 'पीएनबीएचएफएल'च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि/ किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि/ किंवा वरील स्थावर मालमत्ता/ सुरक्षित मत्तेची वासलात आणि दर्जा रकाना क्र. 'के'मध्ये नमूद करण्यात आला आहे. **(२.)** भावी खरेदीदार/ बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना क्र. 'के'मध्ये नमूद केलेली व मंजूर केलेली प्रक्रिया/ आदेश इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट; परंतु त्याकरिता 'पीएनबीएचएफएल'कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांच्या नामाधिकार मर्यादेत नाहीत आणि निविदा/ बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. **(३.)** कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)नुसार, बोलीदार/ खरेदीदाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्री किमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या रुल ९(२)नुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्री किमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्री निश्चितीकरणपत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरेदीदाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्री निश्चितीकरणपत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्री निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता/ सुरक्षित मत्ता सरफेसी अ‍ॅक्टच्या तरतुदींनुसार पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल. **(४.) सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रीच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले- प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२ ००३ वेबसाइट- www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंका किंवा नोंदणीकरिता तुम्हास गणेश अंकुश/ निलाक्षी पाटील, टोल फ्री नं. : १८०० १२० ८८००, जी 'पीएनबीएचएफएल'ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.**

स्थळ : नाशिक, दिनांक : १३.०९.२०२५ — स्वाक्षरी/-, प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड



**महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित**

महाप्रित

(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**महाप्रित कंपनीकडे विविध पदांकरीता करारतत्वावर नियुक्तीसाठी सूचना**

महाप्रित कंपनीमध्ये कार्यकारी संचालक (Transmission) (१ पदे), मुख्य महाव्यवस्थापक (१ पद), मुख्य जमीन आणि मोजणी अधिकारी (१ पद), महाव्यवस्थापक (RESCO-Business Development) (३ पदे), कार्यकारी अभियंता (RESCO) (३ पदे), महाव्यवस्थापक (Agriculture Forestry) (१ पद), महाव्यवस्थापक (Biofuel) (Sustainable Aviation Fuel) (१ पद), महाव्यवस्थापक (Biomass) (१ पद), महाव्यवस्थापक (CSR) (१ पद), महाव्यवस्थापक (ESG-Business Development) (२ पदे), महाव्यवस्थापक (Sales-ESG) (१ पद), उपमहाव्यवस्थापक (Accredited Energy Auditor) (२ पदे), उपमहाव्यवस्थापक (Sales-ESG) (२ पदे), उपमहाव्यवस्थापक (ESG) (१ पद), वरिष्ठ व्यवस्थापक (Investment Banking) (१ पद), वरिष्ठ व्यवस्थापक (ESG) (१ पद), वरिष्ठ विश्लेषक (Gift City, Ahmedabad साठी) (१ पद), विक्री व्यवस्थापक (ESG) (२ पदे), विक्री व्यवस्थापक (AIF) (Head Office-Mumbai) (२ पदे), विक्री व्यवस्थापक (AIF) (Gift City, Ahmedabad) (२ पदे), विक्री अधिकारी (ESG) (२ पदे), विक्री व्यवस्थापक (Government PSU Specialist) (१ पद), उप अभियंता (RESCO) (३ पदे), व्यवस्थापक (Accredited Energy Auditor) (२ पदे), व्यवस्थापक (RESCO-Business Development) (३ पदे), व्यवस्थापक (ESG Business Development) (१ पद), सहाय्यक महाव्यवस्थापक (CSR) (१ पद), अधिकारी (Accredited Energy Auditor) (२ पदे), प्रिंसिपल अधिकारी (AIF) (१ पद), निवृत्त तहसिलदार / नायब तहसिलदार (१ पद), निवृत्त तलाठी (२ पदे), क्रेडीट विश्लेषक (AIF) (१ पद), सहाय्यक क्रेडीट विश्लेषक (AIF) (१ पद), लेखा सहाय्यक, पुणे कार्यालय (१ पद), सहाय्यक अभियंता (Environment) (१ पद), सहाय्यक महाव्यवस्थापक (Agriculture Input) (१ पद), सहाय्यक अभियंता (ESG) (१ पद), सहाय्यक अभियंता (RE) (१० पदे), सहाय्यक अभियंता (SRA/PMAY/AHP) (२ पदे), सहाय्यक अभियंता (TCP) (१ पद), या पदांवर करारतत्वावर १ वर्षाच्या कालावधीकरिता नियुक्ती करण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी इच्छुक उमेदवारांनी **दि. ३०/०९/२०२५ संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत** अर्ज करावेत. अधिक माहितीकरिता कृपया **https://mahapreit.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**कार्यकारी संचालक (प्रशासन)**
**महाप्रित**



homefirst — We'll take you home

**Home First Finance Company India Limited**
**CIN: L65990MH2010PLC240703,**
**Website: homefirstindia.com Phone No.: 180030008425 Email ID: loanfirst@homefirstindia.com**

**परिशिष्ट - IV-A [नियम ८(६) मधील तरतूद पाहावी]**
**अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ मधील नियम ८(६) मधील तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

याद्वारे स्तंभ (ii) मधील कर्जदार व सह-कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे तारण/ भारग्रस्त असलेल्या स्तंभ (iii) मध्ये वर्णन करण्यात आलेल्या अचल मालमत्तांचा होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खाली नमूद थकबाकी अधिक व्याजाच्या वसुलीसाठी प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे आणि ज्याअर्थी, थकबाकीची वसुली करण्यात असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारांचा सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर मालमत्तांची विक्री करून थकबाकीची वसुली करण्याचा विचार असून या मत्तांची खाली नमूद केल्यानुसार ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विक्री करण्यात येईल. होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड यांना स्तंभ (i) नुसार कर्जदार व सह-कर्जदार यांच्याकडून घेणे असलेल्या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी ''ऑनलाइन'' लिलाव राबविण्यात येईल.

| अ. क्र. | कर्जदार व सह-कर्जदाराचे नाव | मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचनेचा दिनांक | मागणी सूचनेतील रक्कम | ताबा दिनांक | बाजार मूल्य | बयाणा रक्कम | लिलावाचा दिनांक व वेळ | बयाणा रक्कम आणि दस्तावेज सादर करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ | प्राधिकृत अधिकाऱ्याचा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | आशिष उत्तम पवार, उत्तम हिरा पवार, कस्तुरीबाई उत्तम पवार | प्लॉट क्र. ६, ब्लॉक क्र. २ (मधला भाग), शेत सर्व्हे क्र. १८१/३/२/१८१/३/३, मेहरूण शिवार, जळगाव, महाराष्ट्र-४२५ ००१. चतुःसीमा : पूर्वेस- ऑनवर्ड स.क्र. १८१/३/४ची डीपी साइड क्र. १५६, पश्चिमेस- वापरकर्त्याचा १० फुटी मोकळा पॅसेज, उत्तरेस- ब्लॉक क्र. ०१, दक्षिणेस- ब्लॉक क्र. ०३. | 03-06-2025 | 15,91,534 | 07-08-2025 | 11,71,000 | 1,17,100 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 2. | हेमंत ज्ञानेश्वर बाविस्कर, माधुरी ज्ञानेश्वर शिंपी, ज्ञानेश्वर पांडुरंग शिंपी | रो हाऊस- प्लॉट क्र. २५, ब्लॉक क्र. १(पश्चिम भाग), प्लॉट क्र. २५, गट क्र. १६, शिरसोल, प्लॉट क्र. २५, गट क्र. १६, शिरसोली, जळगाव-४२५ ००१. चतुःसीमा : पूर्वेस- त्याच प्लॉट क्र. २५चा उर्वरित भाग, पश्चिमेस- प्लॉट क्र. २४, उत्तरेस- ९.० मी. रुंद रस्ता, दक्षिणेस- जी.क्र. १६चा भाग. | 06-05-2025 | 10,27,677 | 07-07-2025 | 9,40,000 | 94,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 3. | हरीश नामदेव चौधरी, ज्योती हरीश चौधरी | गट क्र. ९२३, प्लॉट क्र. २१ (दक्षिणेकडील भाग), ब्लॉक क्र. ई, आदर्श नगर, गोरगवारे रोड, मु. चोपडा, ता. चोपडा, जि. जळगाव, महाराष्ट्र-४२५ १०७. चतुःसीमा : पूर्वेस- ६.०० मी. रुंद रस्ता, पश्चिमेस- प्लॉट क्र. २९, ३०, उत्तरेस- ब्लॉक क्र. बी आणि त्यानंतर मोकळी जागा, दक्षिणेस- प्लॉट क्र. २२. | 03-02-2025 | 16,71,284 | 06-04-2025 | 14,90,000 | 1,49,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 4. | निखिल ज्ञानेश्वर पाटील, कुणाल ज्ञानेश्वर पाटील, शीतल ज्ञानेश्वर पाटील, ज्ञानेश्वर चुडामण पाटील | प्लॉट क्र. २८, ब्लॉक क्र. २ (मधला भाग), सर्व्हे क्र. १८१/१, मेहरूण शिवार, जळगाव, महाराष्ट्र-४२५ ००२. चतुःसीमा : पूर्वेस- ब्लॉक क्र. १, पश्चिमेस- ब्लॉक क्र. ३, उत्तरेस- ९.०० मी. रस्ता, दक्षिणेस- ब्लॉक क्र. ०४ व ०५. | 03-11-2024 | 12,75,723 | 07-08-2025 | 11,05,000 | 1,10,500 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 5 | आकाश भागवत जाधव, भागवत गरबड जाधव, विद्याबाई भगत जाधव | रो हाऊस- प्लॉट क्र. १, बिल्डिंग क्र. ७, मेहरूण आकाश जाधव, ब्लॉक क्र. जी-४ व जी-५, प्लॉट क्र. १, शेत स.क्र. १७०/२/१बी, १७०/२/२बी, मेहरूण, जळगाव, महाराष्ट्र-४२५ ००१. चतुःसीमा : पूर्वेस- ब्लॉक क्र. जी-४, पश्चिमेस- ब्लॉक क्र. जी-६, उत्तरेस- रस्ता, दक्षिणेस- स.क्र. १७०/३. | 03-09-2024 | 12,94,607 | 08-02-2025 | 17,80,000 | 1,78,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 6 | योगेश हरी मराठे, शारदा हरी मराठे | घर- प्लॉट क्र. २०, ब्लॉक/ बिल्डिंग क्र. किंवा नाव- पश्चिम भाग, स.क्र. ९६/१/बी/२, प्लॉट क्र. २० (पश्चिम भाग), भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव, भुसावळ, महाराष्ट्र-४२५ २०१. | 03-06-2024 | 8,91,299 | 07-08-2025 | 7,68,000 | 76,800 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 7. | प्रवीण गोपाळ राठोड, गोपाळ बंडू राठोड, देवकाबाई गोपाळ राठोड | प्लॉट क्र. ७, ब्लॉक क्र. ४, गट क्र. १८४/३, मौजे मेहरूण राठोड, जळगाव, महाराष्ट्र-४२५ ००१. | 03-02-2024 | 14,39,053 | 16-10-2024 | 11,90,000 | 1,19,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 8. | निलेश बाबूलालजी गंगवाल, निकिता गंगवाल | सदनिका क्र. ६, दुसरा मजला, विपुल अपार्टमेन्ट, ४१९ व ४२०, विपुल अपार्टमेन्ट, जालना, महाराष्ट्र-४३१ २०३. | 03-09-2023 | 6,66,924 | 12-06-2025 | 5,00,000 | 50,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 8087478706 |
| 9. | आशुतोष सुधाकर त्रिभुवन, प्रतिभा आशुतोष त्रिभुवन | सदनिका क्र. ७०७, गट क्र. १७२, सारा वाटिका, सारा वाटिका ए३ व ए४ टाइप बिल्डिंग, मौजे शेंद्रा जहांगीर, ता. औरंगाबाद, महाराष्ट्र-४३१ ००१. | 03-08-2023 | 12,63,261 | 17-11-2023 | 14,90,000 | 1,49,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 8329728927 |
| 10. | प्रवीण सोपान कोळी, चारुशीला प्रवीण कोळी | प्लॉट क्र. ५८, पश्चिमेकडील भाग, स.क्र. ७६/५, भुसावळ, ता. भुसावळ व जि. जळगाव, महाराष्ट्र-४२५ २०१. | 04-07-2023 | 33,97,973 | 05-12-2024 | 27,90,000 | 2,79,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 9890283685 |
| 11. | संदीप जाधव, स्वाती मालठणकर | सदनिका क्र. १३, बिल्डिंग-ए, सारा परिवर्तन, सेक्टर सी, विंग २२, गट क्र. २३४/२, हरसूल अनेक्स, सावंगी, औरंगाबाद-४३१ ००१. | 01-04-2021 | 12,53,078 | 11-02-2023 | 9,50,000 | 95,000 | 30-09-2025 (11am-2pm) | 28-09-2025 (upto 5pm) | 8329728927 |

| ई-लिलाव सेवा पुरवठादार | तपशील, इतर अटी व शर्तींसाठी ई-लिलाव वेबसाइट | बयाणा रक्कम / इतर रक्कम जमा करण्यासाठी खाते क्र. | शाखेचा आयएफएससी कोड | लाभार्थ्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| कंपनीचे नाव : ई-प्रोक्यूरमेन्ट टेक्नोलॉजीज लिमिटेड (ऑक्शन टायगर) हेल्प लाइन क्र. : ०७९-३५०२२१६०/१४९/१८२ संपर्क व्यक्ती : राम शर्मा - ८०००२३२९७ ई-मेल आयडी : ramprasad@auctiontiger.net आणि support@auctiontiger.net | http://www.homefirstindia.com https://homefirst.auctiontiger.net | ९१२०२००३६२६८११७ - होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड, अ‍ॅक्सिस बँक लि., एमआयडीसी, अंधेरी पूर्व. | UTIB0000395 | प्राधिकृत अधिकारी, होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड |

**बोलीवृद्धी रक्कम : रु. १०,०००/-.** सदर विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे (https://homefirst.auctiontiger.net) या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ई-लिलाव मंचाच्या माध्यमातून घेण्यात येईल. पोर्टल साइटवर ऑनलाइन ई-लिलाव बोली प्रपत्र, जाहीरनामा, ऑनलाइन लिलाव विक्रीच्या सामान्य अटी व शर्ती असलेले ई-लिलाव निविदा दस्तावेज उपलब्ध आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीप्रमाणे मालमत्तांवर कोणतेही बोजे नाहीत; परंतु इच्छुक बोलीदारांनी आपली बोली सादर करण्यापूर्वी लिलावात काढलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालकी हक्क इ.बाबत तसेच मालमत्तेवर परिणाम करू शकणाऱ्या दावे/ अधिकार/ थकबाकी इ.बाबत स्वतंत्रपणे चौकशी करावी. सदर ई-लिलाव जाहिरात ही होम फर्स्टचे प्रतिनिधित्व किंवा वचन नसून ते तसे समजण्यात येऊ नये. सदर मालमत्तेची विक्री ही होम फर्स्ट यांना ज्ञात व अज्ञात अशा सद्य व भावी बोजांसह करण्यात येत आहे. तिसऱ्या पक्षाकडून करण्यात येणाऱ्या दावे/ अधिकार/ थकबाकी इ.साठी प्राधिकृत अधिकारी/ प्रतिभूत धनको जबाबदार असणार नाहीत. सदर विक्री ही सिक्युरीटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अ‍ॅसेट्स अ‍ॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत विहित नियम/अटींच्या अधीन राहून करण्यात येईल. **भाषांतराबाबत वाद उद्भवल्यास सूचनेची इंग्रजी आवृत्ती ग्राह्य धरण्यात येईल.**

**सरफेसी अधिनियम, २००२ अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना**

कर्जदार/ जामीनदारांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर मागणी सूचनेत नमूद करण्यात आलेल्या रकमेचा ई-लिलावाच्या दिनांकापूर्वी अद्ययावत व्याज आणि इतर शुल्कांसह भरणा करावा, अन्यथा सदर मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.

दिनांकः १५.०९.२०२५
स्थानः औरंगाबाद, जळगाव, पाचोरा, वाळूज

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
होम फर्स्ट फायनान्स कंपनी इंडिया लिमिटेड